**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1168/2007.**

श्री विजय लक्ष्मण भुरे
रा. ग्रामीण वाचनालय, अभियंता कॉलनी,
गणेशपूर, भंडारा ता.जि.भंडारा 441904 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. जी. दाबेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
तकीया रोड, गोकुल भवन, भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था भंडारा
ता. जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी उपस्थित राहू शकणार नाही अशा प्रकारचा अर्ज दिलेला असून त्यांच्या वतीने सहाय्यक सहकार अधिकारी हजर झालेले आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.7.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भंडारा यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) माझे पत्र दि. 6.5.2006, 10.5.2006 12.6.2006 व 26.6.2006 प्रमाणे केलेल्या कार्यवाहीच्या प्रमाणीत प्रती.

2) चार समिती सदस्यांनी आपले पद रिक्त केल्यानंतरही आपल्या अधिकाराचा उपभोग कसे घेत आहेत.

3) आपल्या कडून कारवाई किती दिवसात होईल

4) आणखी काही कागदपत्रांची आवश्यकता आहे काय?

त्यानंतर पुन्हा दि. 25.7.2006 रोजी दुसरा अर्ज दाखल केलेला दिसून येतो व त्यामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) कलम 63 (1 अब) ची प्रमाणित प्रत

2) नियम 58 ची प्रमाणीत प्रत

3) निवडून आलेल्या समिती सदस्यांनी पदग्रहनापासून 15 दिवसाच्या आंत बंधपत्र नमुना म–20 मध्ये निष्पादित केले नाही तर त्यांना समिती सदस्य म्हणून कार्यरत राहता येते काय

4) त्यांच्यावर कारवाई केल्याचे अधिकार कुणला असतात

5) संबंधित अधिका–याकडे तक्रार केल्यास किती दिवसात व कोणती कारवाई होते याची लेखी माहिती मिळण्याची विनंती.

सदरची माहिती स्वतः आपल्या कार्यालयातून घेवून जाणार आहे असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या दोनही अर्जाच्या अनुषंगाने जावक क्र. सनिभं/नियमन/माहितीचा अधिकार/व्ही.एल भुरे/1573/2006 दि. 1.8.2006 च्या पत्राप्रमाणे व जावक क्र. सनिभं/नियमन/माहितीचा अधिकार/व्ही.एल भुरे/1574/2006 दि.1.8.2006 प्रमाणे

शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 9.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये केलेल्या तक्रारीचे चुकीचे व टाळाटाळी करणारे उत्तरे दिली. माझी तक्रार दि. 6.5.2006, 10.5.2006 12.6.2006 व 26.6.2006 केल्या पण उत्तरे मिळाली नाही. दि. 5.7.2006 ला माहिती मिळण्याकरीता अर्ज (जोडपत्र अ) मधील नमुन्यातील सर्व माहिती सादर केल्यानंतरही अर्ज विहीत नमुन्यात सादर केला नाही म्हणून विहित नमुन्यात सादर करावा जेणेकरुन आपणास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळवून माहिती देण्याचे टाळले आहे. 26.7.2006 ला पुन्हा नमून्यात अर्ज केला. 3.8.2006 ला 30 दिवस पूर्ण झाले परंतू माहिती मिळाली नाही. अशा प्रकारे प्रथम अपीलाची कारणे दिलेली आहेत. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.9.2006 रोजी देण्यात आलेला असून सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांनी अर्जदाराचे दोन्ही अर्जाबाबत दिलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत दिलेली आहे परंतु त्यांचे दोन्ही अर्जात नमुद मुद्याबाबतची माहिती दिलेली नाही असे सकृत दर्शनी दिसून येत आहे. तद्वतच अर्जदाराने मागणी केलेले कागदपत्र प्रमाणित करुन दिलेले नाही. यामुळे गैरअर्जदार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांना निर्देश देण्यात येते की, अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये दि. 25.7.2006 ला सादर केलेल्या दोन्ही अर्जावर मुद्येनिहाय माहिती या आदेशापासून 15 दिवसाचे आंत अर्जदारास देण्यात यावे तसेच त्यांनी मागितलेली कागदपत्रे प्रमाणित करुन देण्यात यावे. सदरच्या आदेशाप्रमाणे दि. 14.9.2006 रोजी पुन्हा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा यांनी पत्र क्र. 1886 व पत्र क्र. 1881 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु पुन्हा सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे

4

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची कारणे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका भंडारा पत्र (1) 2018/2006 दि. 19.9.2006 (2) 1886/2006 दि. 14.9.2007 द्वारे मिळालेली माहिती (काही) अपूरी, चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे मला वाटते व पुन्हा माहितीच्या अर्जात विचारलेली माहिती तपशिल म्हणून दिली आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहिती मागण्याकरीता दोन अर्ज केलेले दिसून येतात व त्याविरुध्द एक प्रथम अपील व त्या प्रथम अपीलातसुध्दा दि. 5.7.2006 रोजी केलेल्या कारवाईचा अर्जदाराचा उल्लेख (परंतु आयोगाकडे न दाखल केलेल्या) केलेला दिसून येतो व त्यातच प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल केले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 तरतुदी जेव्हा माहिती मिळण्याच्या अर्जाकरीता 30 दिवसाची मुदत दिली आहे तेव्हा एक अर्ज त्या विरुध्दचे प्रथम अपील त्यासही मुदत दिली आहे व त्याविरुध्द द्वितीय अपील त्यासही मुदत दिली असल्यामुळे अनेक अर्ज पुन्हा त्यावरील एक अपील असा विचार करता येत नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे अर्ज एकाच तारखेचे असल्यामुळे दोन्ही अर्ज विचारार्थ घेण्यात येत आहे. अपीलकर्ता यांनी विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांनी केलेल्या अर्जाच्या कार्यवाही वरील प्रमाणित प्रती हया उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु मुद्या क्र. 2,3,4,5 मध्ये ज्या प्रश्नार्थक स्वरुपात त्यांनी माहिती विचारलेली आहे अशा प्रकारची माहिती ही अधिनियमाच्या कलम 2 मधील ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन व्याख्यांप्रमाणे अपेक्षित नाही. माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, परिपत्रके, टिपण्या इ.च्या स्वरुपात उपलब्ध असेल त्याच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन घेणे एवढाच मर्यादित अर्थ आहे. कोणत्याही प्रकारे माहिती अधिकारी यांचे मत येईल किंवा निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या आधारे प्रश्न विचारलेले आहे. अशा प्रकारचे प्रश्न हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे

अपेक्षित नाही. असे असले तरी माहिती अधिकारी यांनी दि. 1.8.2006 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जरी दिलेले असले व त्यानंतर प्रमाणित प्रती उपलब्ध करुन दिलेले असेल तरी सुध्दा दि. 1.8.2006 रोजी पत्र क्र. 1574 मध्ये अर्ज दि.6.5.2006 व 10.5.2006 च्या अर्जासंबंधाने या कार्यालयाचे दि. 31.5.2006 चे पत्रान्वये माहिती दिली आहे. दि. 26.6.2006 चे पत्रान्वये दि. 31.7.2006 अन्वये संस्थेची तपासणी प्रस्तावित केली आहे. मुद्या क्र. 2 ते 4 ही प्रश्नोत्तराच्या स्वरुपात वर नमुद केल्याप्रमाणे असले तरी व पत्र क्र. 1573 मध्ये मुद्या क्र. 3 ते 5 प्रश्नोत्तराच्या संदर्भात असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. असे असले तरी प्रथम अपीलामध्ये किंवा द्वितीय अपीलामध्ये अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी असे मला वाटते असे म्हटलेले आहे. मात्र आयोगाकडे त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी असे म्हटल्याने त्याबाबतचा खुलासा करणे आवश्यक असते. आयोगाचे ते निदर्शनास आणणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांना वाटते अशा प्रकारची विनंती हे ज्यावेळेस न्याय द्यावयाचा असतो त्यावेळेस विचारात घेता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये जी 1.8.2006, 14.9.2006 व 18.9.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती त्यांच्या अर्जाप्रमाणे आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी अपीलाचे सुनावणीस तोंडी सांगितल्याप्रमाणे जी माहिती त्यांना उपलब्ध झाली आहे त्यामध्ये चुकीची आहे व त्याबद्यल त्यांनी स्टॅम्प उपलब्ध असतांना स्टॅम्प उपलब्ध नाही याप्रमाणे चुकीची माहिती दिली आहे असे सांगितले व त्याकरीता त्यांनी दि. 4.9.2006 चे सह जिल्हा निबंधक वर्ग 1 चे पत्र सुध्दा दाखल केले आहे. परंतु मुळात जो प्रश्न विचारलेला आहे तो प्रश्न हा त्या प्रकरणातील गुणवत्तेच्या निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात आहे व त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम 1960 च्या तरतुदीप्रमाणे संबंधित सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात किंवा गुणवत्तेच्या संदर्भामध्ये निर्णय देणे हे राज्य माहिती आयोगाचे अधिकार कक्षेबाहेरील आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे खारीज करण्यास पात्र आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी यापुढे राज्य माहिती आयोगाकडे अपीलाच्या सुनावणीच्या बाबत उपस्थित राहाणे हे आवश्यक आहे. अर्ज देवून प्रतिनिधी पाठवून गैरहजर राहणे गैरशिस्तीचे आहे व त्याबद्यल त्यांना ताकीद देणे आवश्यक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 25.7.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांनी सदरच्या माहितीच्या आधारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या तरतुदीप्रमाणे संबंधित सक्षम अधिका–याकडे त्यांच्या तक्रारीबद्यल न्याय मिळवून घ्यावा.

2) राज्य जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भंडारा यांनी राज्य माहिती आयोगाच्या पुढे सुनावणीस (अर्ज दिला असला तरी) गैरहजर राहिल्याबद्यल ताकीद देण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 5.3.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.